## स्नेहगुणाचा सण 'संक्रांत'

भारतीय संस्कृतीत सणांना अनन्य साधारण महत्त्व आहे. कारण प्रत्येक सणामागे काही ना काही उद्देश आहे. तिळ आणि गुळाच्या स्नेहगुणांचा सण म्हणजेच मकर संक्रांत. हा सण खरोखरच भारतीय परंपरेतील अनमोल ठेवा आहे. आपल्या स्नेहींना ह्या दिवशी तिळगुळ देऊन 'तिळगुळ घ्या, गोडगोड बोला' असे म्हणून एमकेकांशी प्रेमाचे संबंध कायम ठेवण्याचे आवाहन केले जात असते.

जीवनातील कडवटपणा नष्ट करण्याच्या उद्देशाने एकमेंकांना तिळगुळ दिले जाते. दिवाळी संपल्यानंतरचा व नवीन वर्षाच्या सुरूवातीलाच येणारा पहिला महत्वाचा सण म्हणजे मकर संक्रांत होय. हा सण हिवाळ्यात येत असतो. त्यामुळे आरोग्याच्या दृष्टीने ही ह्या सणाला खूप महत्त्व प्राप्त झाले आहे. थंडीमुळे त्वचेमधील स्निग्धता कमी होऊन त्वचा कोरडी होते. तसेच शरीरातील उष्णताही कमी होत असते. तिळ ही स्निग्धता कायम ठेवण्याचे तर गुळ हा उष्ण असल्याने शरीरात उष्णता निर्माण करण्याचे काम करत असतो. या दिवसापासून दिवस हा तिळा- तिळाने मोठा होत जातो, अशी अख्यायीका आहे.

भारतीय संस्कृतीतील जवळजवळ सर्वच सण महिलांसाठी पर्वणीच असते. त्यातील एक मकर संक्रांत. सुवासिनी स्त्रिया ह्या दिवशी हळदी कुंकू देण्या घेण्याच्या उद्देशाने गोळा होतात. त्यामुळे जातीधर्मातील मतभेद दूर करण्याचा अप्रत्यक्षरित्या संदेश दिला जात असतो.

भारतील प्रत्येक राज्यात वेगवेगळ्या पध्दतीने संक्रांत सण साजरा केला जातो. गुजरातमध्ये आकाशात रंगबेरंगी पतंग उडवून तरी महाराष्ट्रात नवदांपत्यांना, नुकत्याच जन्मलेल्या बालकांना पहिल्या संक्रांतीला हलव्याचे दागिने घालून हा सण साजरा करण्याची प्रथा आहे. नाशिक जवळ येवरा येथे यादिवशी पतंगोत्सव साजरा करण्याची प्रथा आहे.

पुर्वी काटेरी हलव्याची दागिने घरीच तयार केली जात होती. मात्र ती आजच्या रेडिमेडच्या जमान्यातील बाजारात सहज उपलब्ध होत असतात. आधी हलव्याचे दागिने घालण्याची प्रथा प्रामुख्याने ब्राह्मण समाजामध्ये होती. मात्र, आता सर्वच मराठी घरांमध्ये हलव्याच्या दागिन्यांनी हा सण साजरा केला जाताना दिसतो.

भारतीय संस्कृतीत काळा रंग अशुभ मानला जातो, मात्र काळे कपडे परिधान करून साजरा केला जाणारा संक्रांत हा सण एकमेव आहे. या दिवशी सुवासिनी काळ्या रंगाची साडी तर पुरूष काळ्या रंगाचा कुर्ता पायजामा परिधान करीत असतात. 14 जानेवारीला सकाळच्या पहरी सूर्य मकर राशीत प्रवेश करतो. त्यामुळे संक्रांतीचा सण साजरा केला जातो. संक्रांतीपासून सूर्य मकरराशीत प्रवेश करतो. या दिवसापासून उत्तरायणाला प्रारंभ होतो. उत्तरायणात सूर्यदेवतेची उपासना करण्याचा प्रघात आहे.

सूर्य आषाढ महिन्यात कर्क राशीत प्रवेश करतो तेव्हा दक्षिणायनास प्रारंभ होतो. व पौष महिन्यात सूर्य मकर राशीत प्रवेश करतो तो मकर संक्रांतीचा दिवस असतो. त्या दिवशी स्नेहाचे प्रतीक म्हणुन तिळगुळ वाटण्यात येतो. मकर संक्रातीच्या कुलाचार तीन दिवसांचा असतो. पाहिल्या संक्रातीच्या आदल्या दिवशी भोगी असते. दुसऱ्या दिवशी संक्रांत व तिसरा किंक्रांतीने या सणाचा आनंदाने समारोप होत असतो.

## संक्रांतीचा धार्मिक पैलू



भारतीत संस्कृतीत सणांची मोठी परंपरा आहे. प्रत्येक सण काही विशिष्ट संदेश देत असतो. एक वेगळी प्रेरणा अशा सणांतून आपल्याला मिळत असते. मकर संक्रांत हाही असाच प्रेरणा देणारा सण आहे. भारतीय धर्मशास्त्रामध्ये संक्रांत साजरी करण्याच्या अनेक पद्धती आढळून येतात. प्रत्येक राज्यामध्ये भिन्न पद्धतीने संक्रांत साजरी केली जाते.

या वर्षी संक्रांतीचा पुण्यकाल 14 जानेवारी रोजी (बुधवारी) सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत आहे. ऋतू बदलत असल्याने शास्त्रात सांगितल्याप्रमाणे या दिवशी तीळमिश्रित पाण्याने स्नान करावे. तिळाचे उटणे अंगास लावावे, तीळ होम करावा, या साऱ्या विधींसोबतच तीळ भक्षण करणे तितकेच महत्त्वाचे आहे. म्हणूनच आपण संक्रांतीला तीळ भक्षण करत असतो.



तीळदान करण्यानेही पुण्य प्राप्त होत असल्याने आपण या दिवशी एकमेकांना तिळगूळ देत असतो. अशा एकूण सहा प्रकारे आपण तिळाचा संक्रांतीच्या दिवशी उपयोग करत असतो.

**या काळात खालील बाबी कटाक्षाने टाळाव्यात :**

पर्वकालात दात घासणे, कठोर बोलणे, वृक्ष- गवत तोडणे, गाई-म्हशींची धार काढणे, आदी कामे करू नयेत.

**संक्रांत पर्वकालात स्त्रियांनी करावयाची दाने :**

नवे भांडे, गायीला घास, तीळपात्र, सोने, गाय, वस्त्र, घोडा, गूळ इत्यादी यथाशक्ती दाने करावीत.

## संक्रमणः अंधाराकडून प्रकाशाकडे



सूर्याने एका राशीतून दुसऱ्या राशीत जाणे म्हणजे 'संक्रमण करणे'. पौष महिन्यात सूर्य मकर राशीत प्रवेश करतो. यामुळे या सणाला 'मकरसंक्रांत' असे म्हणतात. या दिवशी सूर्य पृथ्वीची परिक्रमा करण्याची दिशा बदलवतो. म्हणजेच सूर्य थोडा उत्तरेकडे झुकतो. यामुळे या वेळेला उत्तरायण असेही संबोधतात. सूर्याच्या संक्रमणासोबतच जीवनाचे संक्रमण जोडले आहे. यामुळे या उत्सवाला सांस्कृतिक दृष्टीनेही महत्त्व आहे.

### 'तमसो मा ज्योतिर्गमय'

'अंधाराकडून प्रकाशाकडे वाटचाल करणे' ही वैदिक ऋषींची शिकवण या दिवशीच प्रयत्नांनी साकार होते. या दिवशीच कर्मयोगी सूर्य अंधकारावर आक्रमण करण्याचा दृढ संकल्प करतो. या दिवसानंतर अंध:कार हळूहळू कमी होत जातो. या दिवसापासून चांगले काम करण्यासाठी शुभ दिवसांची सुरवात होते. म्हणूनच मकर संक्रांतीनंतरच आपला मृत्यू यावा असे अनेक वृद्धांना वाटते. यमराजाला उत्तरायण आरंभ होईपर्यंत थांबवणाऱ्या भीष्म पितामह याचे उदाहरण ज्वलंत आहे.

शुक्ल पक्ष अग्नी, ज्योती व प्रकाश याने तर कृष्ण पक्ष अंधकाराने युक्त असतो. या दृष्टीने बघितले तर उत्तरायणामध्ये मृत्यू येणे हे तेजस्वी समजले जाते. काळे व भीतिदायक जीवन मनुष्याला नित्कृष्ट मृत्यूकडे घेऊन जाते.

### प्रकाशाचा अंधारावर विजय

मानवी जीवन प्रकाश व अंधाराने भरलेले आहे. त्याच्या जीवनाचे वस्त्र काळ्या व पांढऱ्या तंतूंनी बनलेले आहे. अज्ञान, अंधश्रद्धा, कुसंस्कार ही अंध:काराचे प्रतीके आहेत. अज्ञानाकडून ज्ञानाकडे, अंधश्रद्धेकडून श्रद्धेकडे, कुसंस्काराकडून संस्कारांकडे जाणे हीच मानव जीवनातील संक्रांत ठरेल.

### संक्रांत म्हणजे क्रांती



क्रांतीत फक्त परिस्थिती परिवर्तनाची अपेक्षा असते. पण संक्रांतीत परिस्थिती स्थापन करण्याची अभिलाषा असते. यासाठी फक्त संदर्भच नव्हे तर मानवी मनातील संकल्पही बदलायला हवेत. हे काम फक्त क्रांतीनेच शक्य आहे. क्रांतीत हिंसेला महत्त्व असते. पण संक्रांतीत समजूतदारपणाला महत्त्व आहे. अहिंसेचा अर्थ 'प्रेम करणे' असा होतो. संक्रांतीचा अर्थ डोके उडविणे असा नव्हे तर डोक्यातील विचारांना बदलविणे असा होतो.

### संक्रांती म्हणजे संगक्रांती

या दिवशी मानवाला काम, क्रोध, लोभ, मोह, मत्सर या विकारांतून मुक्त होण्याचा प्रयत्न करायला हवा. मुक्त जीवन जगणाऱ्या लोकांची संगत धरावी. असेच लोक क्रांतीला योग्य दिशा व मार्ग दाखविण्यासाठी मार्गदर्शन करू शकतात.

### संक्रांती म्हणजेच संघक्रांती

कोणतेही मोठे कार्य करण्यासाठी संघाची आवश्यकता असते. 'संघे शक्ती कलौ युगे' संघाने विशिष्ट शक्ती निर्माण होते. या विशाल जगात कोणतेही काम एकटा मनुष्य करू शकत नाही. त्याची शक्ती मर्यादित असते. संघात जास्त प्रमाणात शक्ती असते. ही शक्ती कोणतेही काम सहज शक्य करते.

या सणाच्या निमिताने परिचित लोकांकडे जाणे जुनी भांडणे विसरून, नव्याने स्नेहाचे संबंध निर्माण करण्यासाठी ही छान संधी असते.

**मकर संक्रांतीचा शुभेच्छा...**